प्रकरण - ६

# उपसंहार

# प्रकरण -६ वे

# उपसंहार

सीताराम सावंत हे मराठी साहित्यातील महात्त्वाचे प्रादेशिक लेखक आहेत. त्यांनी कथा, कादंबरी, ललित लेखक यासारख्या वाङ्मयप्रकारातून माणदेशी अनुभव विश्व आविष्कृत केले आहे. या माणदेशी प्रदेशाची वैशिष्टये आणि त्यांच्या 'नामदार' आणि 'लगीन' या कादंबऱ्यातील प्रदेशाची व जीवनाशयाची वैशिष्टये एकसारखीच आहेत. माणदेशाच्या मातीत जन्मलेले सावंत आपल्या प्रदेशाचे संपूर्ण वर्णन आपल्या कादंबऱ्यातून करताना आढळतात. 'नामदार' आणि 'लगीन' या कादंबऱ्याचा वाङ्मयीन आणि सामाजिक अंगाने अभ्यास प्रस्तुत लघु प्रबंधामध्ये केला आहे. त्याची विस्तृत मांडणी पाच प्रकरणांमध्ये केली आहे. या सहाव्या प्रकरणामध्ये उपसंहार करण्याचे प्रयोजन आहे.

प्रस्तुत लघु प्रबंधाच्या पाहिल्या प्रकरणात कादंबरी या वाङ्मय प्रकाराची संकल्पना अभ्यासून इंग्रजी राजवटीच्या परिणामातून निर्माण झालेली मराठीतील पहिली कादंबरी म्हणून हरि केशवजी यांच्या 'यांत्रिकक्रमण' या कादंबरीचा निर्देश केला जातो. कादंबरीचा हा प्रवास र. वा. दिघे यांच्या 'पाणकळा' या कादंबरीपासून बहरास आला. आणि तिथपासून प्रादेशिक कादंबऱ्यांची निर्मिती होऊ लागली. या प्रकरणामध्ये ग्रामीण कांदबरीचा इतिहास अभ्यासून तिचा विकास ध्यानात घेतला आहे. अशा या ग्रामीण कादंबरीची सुरूवात 'बळीबा पाटील' पासून झाली. ग्रामीण माणसाच्या शोषणावर, तिथल्या दुष्काळावर, अज्ञानावर प्रकाश ग्रामीण साहित्यातून टाकला गेला. मराठी-ग्रामीण साहित्याचा विचार करताना १९२० नंतर लिहिले गेलले साहित्य गांधी युगामुळे प्रभावित झालेले दिसते. साहजिकच खेड्यातील दुःख दारिद्रय, अज्ञान यांचे चित्रण मराठी कादंबरीत होऊ लागले. त्यातूनच प्रादेशिक ही संकल्पना पुढे आली. ज्या कादंबरीत विशिष्ट प्रदेशाशी एकनिष्ठ राहून त्या प्रदेशातील निसर्ग व परिसर, सामाजिक रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांचे चित्रण केलेले असते. त्यास 'प्रादेशिक कादंबरी' असे म्हणतात. उपेक्षित जीवनाचे लोकसंस्कृतीचे, कृषिसंस्कृतीचे, प्राणिसंस्कृतीचे प्रस्तुतीकरण करण्याचे कार्य करत असते.

माणदेशी प्रादेशिक कादंबरीमध्ये माडगूळकर, तुपे, भोसले, यांनी विविध वाङ्मय निर्मिती करून मराठी साहित्यात लक्षणीय भर घातली. या प्रादेशिक कांदबरीचे काही विशेष सांगता येतील. भौगोलिकता हा प्रादेशिक कादंबरीचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. प्रत्येक भू-भाग विशिष्ट अशा वैशिष्ट्यांनी आपले वेगळेपण जपतो. त्या प्रदेशात समुह जीवनप्रणाली असते. अज्ञानामुळे या लोकांचा विश्वास देवदेवता व अन्य अंधश्रद्धेवर अधिक असतो. अशा या वैशिष्टयपूर्ण जीवनाचे दर्शन त्यांच्या प्रादेशिक बोलीत या कादंबरीतून व्यक्त होते.

अशाप्रकारे पहिल्या प्रकरणात कादंबरी म्हणजे काय ? ग्रामीण कादंबरीची वाटचाल तिचे विशेष ग्रामीण कादंबरीतील प्रादेशिक कादंबरी एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार व तिचे विशेष इ. घटकांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

'माणदेश' आणि माणदेशी साहित्य या दुसऱ्या प्रकरणात माणदेश म्हणजे काय ? या माणदेशाची वैशिष्ट्ये आणि माणदेशी साहित्य परंपरा यांचा अभ्यास केला आहे. माणदेश हा पश्चिम महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण भू-भाग आहे. सांगली, सातारा, सोलापूर या तीन जिल्ह्यांच्या सीमारेषेवरील प्रदेश म्हणजे माणदेश होय. महाराष्ट्रातील इतर प्रदेशाप्रमाणे माणदेशालाही भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक वेगळेपण लाभले आहे. माणदेशाचा प्रदेश रूक्ष आहे. हा प्रदेश असंख्य पिढ्यापासून दुर्लक्षित व मागास राहिला आहे. उघडी बोडकी माळराने, काटेरी खुरटी झुडपे, जागोगागी दगडगोट्यांच्या डोंगर रांगा हे या प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे. अनिश्चित पाऊस असल्याने हा प्रदेश कोरडा आहे. प्राकृतिक रचनेच्या दृष्टिकोनातून माणदेश इतर प्रदेशाच्या तुलनेत फारच वेगळा आहे. माणदेशाचे हवामान सर्वसाधारणपणे समशितोष्ण आहे. येथील जमिनी बेसाल्ट नावाच्या अग्निजन्य खडकापासून तयार झाल्या आहेत. रासायनिक पदार्थाचे अल्प प्रमाण आणि कमी पाऊस यामुळे येथील जमिनी चांगल्या पिकत नाहीत.

माणदेशातील खिलार जनावरे ही देखणी, चपळ व कष्टाळू आहेत. पावसाच्या अल्प प्रमाणामुळे तीन वर्षातून एकदा दुष्काळ ठरलेला असतो. येथील बहुतांशी लोक निरक्षर अल्याने ते शेतमजूरी व शेळ्या-मेंढ्या पालन व्यवसायात गुंतलेले आहेत. या लोकांच्यावर अंधश्रद्धेचा पगडा आहे. देव-देवता व संत यांना मानणारी ही जनता रूढी परंपरेच्या अधिन आहे. असे असूनही सर्व जाती धर्माचे लोक आपले एकसंघपण टिकवून आहेत. येथील प्रत्येक गावाचे काही ग्रामविशेष लक्ष वेधून घेतात.

माणदेश हा साहित्य संपन्न प्रदेश आहे. येथील साहित्यिकांनी लिहिलेले साहित्य मराठी भाषेच्या सीमा ओलांडून सातासमुद्रापलिकडे पोहचले आहे. या प्रदेशातील श्री. म. माटे, ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, द. ता. भोसले, उत्तम तुपे, कृष्णा इंगोले यासारख्या लेखकांनी मराठी साहित्य समृद्ध केले आहे. या साहित्य परंपरेनेच येथील नवोदित लेखक लेखन करीत आहेत. या लेखकांमध्ये सीताराम सावंत यांचे स्थान स्वतंत्र व महत्त्वपूर्ण आहे. अशा या सामर्थ्यवान लेखकाचा वाङ्मयीन परिचय विस्तृत मांडला आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये 'नामदार' या सीताराम सावंत यांच्या कादंबरीचा अभ्यास केला आहे. या कादंबरीत त्यांनी स्वत:ला आलेले अनुभव व स्वभोवतालची राजकीय परिस्थिती यांचे भान ठेवून लेखन केले आहे. त्यातून त्यांनी राजकारण व्यक्त करताना मनोरंजन व प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरीच्या कथानकाची सुरूवात माणदेशात होते. पण नायक अपमानापोटी माणदेशातून

स्थलांतर करतो आणि कादंबरीचे कथानकही माणदेशातून स्थलांतर होताना दिसते. परंतु या कथानकावर माणदेश व परिसराची गडद छाया पडली आहे. ही कादंबरी पात्रमुखी निवेदनाने साकार झाली आहे. यातील प्रत्येक पात्र आपली स्वत:ची कहाणी सांगत आहे. अशा प्रकारचे निवेदन या कादंबरीत आहे. छगन या एकाच व्यक्तिरेखेस केंद्रस्थानी मानून ह कादंबरी लिहिली आहे.

वाचकाला एका वेगळ्या अनुभव विश्वाचा आनंद मिळावा या प्रयोजनाखातही कादंबरी लिहिली गेली आहे. सवतीचे पोर म्हणून छगनची अवहेलना केली जाते व त्याच्यावर विनयभंगाचा आळ घेऊन त्याला घरातून हाकलले जाते. घरातून बाहेर पडलेला छगन जगाच्या आपल्या परीने पाहिजे तसा उपयोग करून घेतो. प्रत्येकाला मूर्ख बनवत सुटतो. शेवटी त्याला मृत्यूची जाणीव होते आणि तो लहान मुलासारखा वागू लागतो. स्त्रियांच्या विविध समस्यांचा विचार कादंबरीत केला आहे. स्त्री शिक्षण, विधवा विवाहास नकार, दुप्पट वयाच्या पुरुषाबरोबर लग्न अशी स्त्री मानवाच्या अत्याचाराला बळी पडताना दिसते. समाजातील अनिष्ठ रूढी परंपरांविषयी त्यांच्या लेखनातून समाज प्रबोधन केले जाते.

समाजजीवनामध्ये माणदेशी जीवनातील समाजमनाची गुंतागुंत व समाजजीवनाचे विविध कप्पे शब्दबद्ध केले आहेत. छगनच्या आईला साप चावल्यानंतर तिला दवाखान्यात घेऊन जाण्याऐवजी मारूतीच्या मंदिरात नेले जाते. अखेर ती मृत्यू पावते. हा बळी माणदेशातील अंधश्रद्धेनेच घेतला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. पत्नीच्या निधनानंतर नामू आबा दुसरे लग्न करताना दिसतात. पण आवडा पती निधनानंतर विधवा बनून माहेरी आईकडे राहताना दिसते. निवडणुकीनंतर राजकीय पक्षाच्या निघालेल्या मिरवणुकाही समाजमनाची साक्ष देतात. त्याच राजकीय नेत्यांना मंदिरातील देव दर्शनसाठी रांग लावण्याचेही बंधन राहत नाही. नामदारमध्ये विविध जातीधर्मातील लोकांचे वर्णन येते. वाघमऱ्याचा शिवा, लोहार, धनगर या जातींचाही उल्लेख आढळतो. या कादंबरीतील विविध प्राणी हे ही माणदेशाचे वेगळेपण जपतात. खिलार जनावरे, शेळ्या-मेंढ्या, रानटी पशु-पक्षी यांचा निर्देश केला जातो. या कादंबरीतील बऱ्याच व्यक्तिरेखा अज्ञान व दारिद्रयाने पछाडलेल्या आहेत. अशा प्रकारे 'नामदार' मध्ये माणदेशी लोकजीवनाचे आणि लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब पडले आहे.

या कादंबरीच्या शक्तिस्थानामध्ये कादंबरीची बालबोध वळणाची सुरूवात, विविध बातम्यांचा वापर, जीवनातील अमूल्य प्रसंग, वेगवेगळ्या लोकांचे अनेक प्रकारचे स्वभाव, बुकाबाई ही व्यक्तिरेखा आणि मृत्यू हे जीवनातील अटळ सत्य यांचा उपयोग कादंबरीकाराने केलेला आहे. सावंत यांनी विविध दिवास्वप्नांची रेलचेल या कादंबरीत प्रकट केली आहे. तरीही रसिक वाचकास तिचार करण्यास प्रवृत्त करणारी ही कादंबरी आहे.

सीताराम सावंत यांच्या 'लगीन' या कादंबरीचा अभ्यास चौथ्या प्रकरणात केला आहे. सदा आणि मीना यांचे लग्न या कथाबीजाचा विस्तार करताना शेतकरी जीवन आणि शेतकऱ्यांचे प्रश्न व समस्यांचे वर्णन या कादंबरीत केलेले आहे. सदा हा माणदेशातील तरूण, तडफदार, कष्टाळू, जिद्दी आणि ध्येयवादी शेतकरी आहे. त्याच्या माध्यमातून विविध समस्यांचा वेध कादंबरीकाराने घेतला आहे. याशिवाय कादंबरीच्या कथानकामध्ये वैचारिकता अधिक प्रमाणात आढळते.

'लगीन' कादंबरीतील माणदेशी समाजजीवन रूढी परंपरेने ग्रासलेले आहे. अंधश्रद्धा ही येथील लोकांचा दागिना असल्यासारखी आहे. माणदेशात साजरे होणारे सण उत्सव ,विविध विधी यांच्यासाठी अनाठाई खर्च केला जातो. माणदेशामध्ये राहणारे लोक हे विविध जातीधर्माचे आणि पंथांचे आहेत. माणदेशात अजूनही अशिक्षितांचे प्रमाण अधिक आहे. येथील स्त्रिया या अन्याय व अत्याचार सहन करणाऱ्या आहेत. येथे दळणवळणाच्या साधनांचा अभाव आढळतो. येथे हंगामी स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. सर्वसाधारण पिकांवर आणि उत्पन्नावर समाधान मानणारे लोक माणदेशात आहेत.

माणदेशातील निसर्ग आपल्या शैलीने सर्वांना मोहित करणारा आहे. पाण्याचे दुर्भिक्ष, बरड माळरान, तीन वर्षातून दुष्काळ, हंगामी नद्या आणि पिके हे येथील निसर्गाचे वैशिष्ट्य आहे.

'लगीन' कादंबरीच्या शक्तिस्थानांचा विचार करताना 'लगीन' कादंबरीच्या कथाबिजाचा समर्थ विस्तार कादंबरीत केला आहे.या कादंबरीत उपकथानकांचा प्रभावी वापर केलेला आहे. वाचकांच्या मनात रूतून बसणाऱ्या व्यक्तिरेखा कादंबरीत आहेत. माणदेशी बोलीचा प्रभावी वापर कादंबरीत आढळतो. समर्थक निवेदन शैलीचा वापर केला आहे. या कादंबरीचा सुखांत शेवट आहे. एकंदरीतच लगीन कादंबरीतून माणदेश साजिवंत होताना दिसतो.

पाचव्या प्रकरणामध्ये 'नामदार' आणि 'लगीन' कादंबऱ्यांची वाङ्मयीन वैशिष्टये अभ्यासली आहेत. भाषाशैलीचा अभ्यास करीत असतना निवेदन, संवाद, प्रादेशिक शब्द, वाक्प्रचार, म्हणी, सुभाषिते , उपमा, घोषणा व शिव्या यांच्या अनुषंगाने माणदेशी बोलीचा, प्रादेशिक भाषेचा अभ्यास या प्रकरणात केला आहे.

माणदेशी परिसरातील भाषेचे प्रदेशनिष्ठ वेगळेपण या कादंबऱ्यामध्ये जाणवते. माणदेशी परिसरात बोलली जाणारी बोलीभाषा ही इतर मराठी बोलीभाषेहून सर्वस्वी वेगळी आहे. या बोलीतील भावोत्कटता आणि सहजता यामुळे भाषेमध्ये जिवंतपणा जाणवतो. भाषा ही साधी सरळ आणि ओघवती आहे. बोलीभाषेच्या वापराने लेखकाने वर्णनात हुबेहुबपणा आणुन चित्रमय वर्णन केले आहे. या भाषेत परिणामकारकता आहे. भाषेमुळे कथानक गतिशील बनले आहे. जीवनातील संघर्ष व्यक्त करीत असताना बोलीभाषेचा वापर प्रभावी ठरला आहे. कथानक, पात्रे, वातावरणनिर्मिती आणि निवेदन पद्धतीची

भाषा यांच्या आश्रयाने लेखकाने उत्कट जीवनानुभव 'नामदार' आणि 'लगीन' या कादंबऱ्यातून आविष्कृत केला आहे.

सहाव्या प्रकरणामध्ये पहिल्या पाच प्रकरणातील केलेलाअभ्यास निष्कर्ष रूपाने मांडला आहे.

सीताराम सावंत यांच्या 'नामदार' २००३ आणि 'लगीन' २००५ या कादंबऱ्याच्या अनुषंगाने त्यांच्या कादंबरीलेखनाचा अभ्यास करून काही निष्कर्ष निघाले असून ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

**निष्कर्ष :-**

१. सांगली, सातारा, सोलापूर या तीन जिल्ह्यांच्या सीमारेषेवर पसरलेला ओसाड प्रदेश म्हणजे माणदेश होय. या प्रदेशात एकूण २१० गावे व सव्वा सात लाख लोकसंख्या राहते. सुधारणा व सुखसोयीपासून हा प्रदेश दुर्लक्षित आहे.

२. माणदेशाच्या भाव-भावना प्रकट करणारे लेखक सीतारात सावंत आपल्या कादंबऱ्यातून माणदेश साजिवंत करताना दिसतात.

३. सावंत यांच्या कादंबऱ्यातून आधुनिक बदलत्या माणदेशाचे वर्णन येते. माणदेशाच्या जुन्या समस्यांबरोबरच नवीन समस्यांचा ऊहापोह आढळतो.

४. सीताराम सावंत यांनी एका वेगळ्या अनुभवाचे विश्व निर्माण करून निराळा आशय, विषय, भावना, विचार, शैली आणि बोली भाषा या द्वारे त्यांनी मराठी साहित्य समृद्ध केले .

५. या कादंबऱ्या सामाजिक वास्तवावर आधारलेल्या असल्याने शोषित पिडित माणदेशी शेतकरी कुटुंबांचे जीवन, दु:ख, प्रश्न, समस्या यांची जाणीव करून देवून समाज प्रबोधन करणारा आशय व्यक्त केला आहे.

६. निसर्गाची अवकृपा येथे आढळून येते व दर तीन वर्षातून एक वर्ष हमखास दुष्काळाचे असते. तरीही येथील जनता सहनशील असल्याने केवळ 'जीवनभोग' म्हणून जीवन कंठत आहेत. याचा अनुभव सावंत यांच्या कादंबऱ्यातून येतो.

७. लेखकाचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या आजुबाजूच्या भौगोलिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर घडत असते. त्यांच्या अवतीभोवती असणाऱ्या निसर्गाचा परिणाम त्यांच्या मनावर होत असतो. त्याचा प्रत्यय सीताराम सावंत यांच्या कादंबऱ्यातून येतो.

८. 'नामदार' कादंबरीचे कथानक 'छगन' या एकाच व्यक्तिरेखेभोवती फिरताना दिसते. त्यामध्ये छगनची विविध रूपे कादंबरीकाराने वाचकांसमोर प्रकट केली आहेत.

९. या कादंबरीचे कथानक नायकाबरोबर माणदेशातून स्थलांतरित होते. पण त्या कथानकावर माणदेश परिसराची, समाजजीवनाची व लोकसंस्कृतीची गडद छाया पडल्याचे जाणवते.

१०. 'नामदार' कादंबरीमध्ये माणदेशातील ओसाड, उजाड माळराने व काटेरी, खुरट्या निसर्गाबरोबरच माणदेशालगतच्या हिरव्यागार निसर्गाचेही वर्णन आले आहे.

११. माणदेशी शेतकरी कुटुंबातील मुलगा आपल्या कर्तृत्ववान कार्याने नामदारपदापर्यंत पोहचतो याची यशस्वी कहाणी सावंत यांनी मांडली आहे.

१२. मानवी जीवनातील अटळ सत्य म्हणजे मृत्यू. त्याला कोणीही टाळू शकत नाही. मृत्यूला विसरल्यास मानवाच्या हातून दुष्कृत्य घडताना दिसतात. मृत्यूची साधी आठवण जरी झाली तर कोणीही वाईट कृत्य करणार नाही. याची प्रचीती 'नामदार' कादंबरी वाचल्यानंतर येते.

१३. 'नामदार' कादंबरीमध्ये राजकारण, मनोरंजन, प्रबोधन या त्रिवेणीचा संगम झाला आहे.

१४. एक अस्सल माणदेशी कादंबरीकार म्हणून सीताराम सावंत यांची ओळख करून देणारी कादंबरी म्हणून 'लगीन' कडे पाहिले जाते.

१५. एका सर्वसामान्य दोन कुटुंबातील जिव्हाळ्याच्या संबंधाबरोबरच शेतकऱ्यांच्या विविध समस्या व प्रश्न यांचा ऊहापोह 'लगीन' या कादंबरीत केला आहे.

१६. 'नामदार' आणि 'लगीन' कादंबऱ्यातून माणदेशातील समाजजीवन प्राणीजीवन, लोकसंस्कृती यांचा प्रत्यय येतो.

१७. सदा हा तरूण तडफदार, कष्टाळू, जिद्दी आणि ध्येयवादी माणदेशी शेतकऱ्याचे चित्र लेखकाने अत्यंत प्रभावीपणे साकार केले आहे.

१८. सीताराम सावंत यांची कादंबरी माणदेशी ग्रामीण परिसराचे व मनोविश्वाचे दर्शन घडविते.

१९. माणदेशातील कौटुंबिक जीवन वैशिष्ट्यपूर्ण असून एखादे जनावर हे सुद्धा त्याच्या कुटुंबातील घटक बनते. उदा. भीमानानांच्या कुटुंबातील खिलार गाय.

२०. दारिद्र्यामुळे रोगराई, दुष्काळ आणि निसर्गकोपामुळे कधी अनपेक्षित तर कधी अपेक्षित संकटामुळे तर कधी नियतीच्या प्रभावाखाली चिरडले गेल्यामुळे येथील समाज जीवनात सोशिकता आलेली आहे.

२१. माणदेशातील निसर्ग आपल्या सर्व रंगढंगासह या कादंबऱ्यांतून अवतरला आहे.

२२. माणदेशातील कृषिकेंद्रीत जीवनावर लहरी निसर्गाचा परिणाम होतो. म्हणूनच माणदेशातील माणसे निसर्गाच्या हातातील बाहुले आहेत.

२३. सीताराम सावंतांनी 'नामदार' कादंबरीसाठी पात्रमुखी निवेदन पद्धती वापरली आहे त्यामुळे त्या कादंबरीत पात्रे मनातील सर्व भाव उकलताना दिसतात. तर 'लगीन' कादंबरीमध्ये प्रथम पुरूषी व तृतीय पुरूषी निवेदनाचा वापर केलेला आहे.

२४. सीताराम सावंत हे यशस्वी दर्जाचे साहित्यिक आहेत. त्यांची भाषा पारदर्शक व नितळ आहे. भाषा ही छोट्या छोट्या वाक्यांची साध्या सोप्या व ओघवत्या शैलीची आहे.

२५. माणदेशी बोलीच्या वापरामुळे संवादात उठावदारपणा आला आहे.

२६. सीताराम सावंत यांचे समाजजीवनाचे सूक्ष्म निरीक्षण असल्याने तेथील म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते यांच्या वापरामुळे माणदेशी बोलीचे सौंदर्य नजरेत भरते व त्या भाषेत सहजता, भावोत्कटता, परिणामकारकता, वैचारिकता हे विशेष जागोजागी प्रत्ययास येतात.

सीताराम सावंत यांच्या 'नामदार' आणि 'लगीन' या दोन्ही कादंबऱ्या माणदेशाचे प्रदेशनिष्ठ चित्रण करणाऱ्या आहेत. माणदेशातील सोशिक व स्थलांतरित व्यक्तिरेखांना त्यांनी अत्यंत प्रभावीपणे उठाव दिलेला आहे. त्याचबरोबर माणदेशाचा परिसर, तेथील निसर्ग, प्राणीजीवन, तेथील कृषिसंस्कृती, प्रदेशनिष्ठ चालीरीती, परंपरा यांचे दर्शन त्यांच्या कादंबऱ्यातून ठाई ठाई घडते. माणदेशी माती आणि माणूस यांचे दृढ नाते या कादंबऱ्यातून व्यक्त होते. तसेच या कादंबऱ्यातील संवादासाठी वापरलेली माणदेशी बोली वैशिष्ट्यपूर्ण अशीच आहे. त्यांच्या दोन्ही कादंबऱ्यात अस्सल माणदेशाचे जीवनदर्शन घडवितात. मराठीतील प्रादेशिक कादंबऱ्यांमध्ये त्यांच्या या कलाकृती नि:संशय श्रेष्ठ दर्जाच्या व उल्लेखनीय अशा आहेत. माणदेशी वातावरण निर्मिती, संवादात माणदेशी बोलीच चपखल वापर आणि सुटसुटीत कथानक यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांचे स्थान श्रेष्ठ दर्जाचे आहे यात शंका नाही.

-----x-----